
दै. लोकमत
दि. ०१ जुलै २०२५

लोकमान्य लोकमत भारत रत्नमाला

तत्त्वनिष्ठ नेतृत्वाचा आदर्श- चक्रवर्ती राजगोपालचारी

१९54 मध्ये भारतरत्न या देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मानाची घोषणा झाली आणि पहिल्याच वर्षी मानकरी ठरलेल्या तीन व्यक्तींमध्ये चक्रवर्ती राजगोपालचारी हे नाव अग्रस्थानी होते. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, लेखक, विचारवंत, कुशल प्रशासक आणि स्वतंत्र भारताचे पहिले व एकमेव भारतीय गव्हर्नर जनरल अशा अनेक भूमिकांमध्ये त्यांनी देशसेवा केली.

तत्कालीन मद्रास प्रेसिडेन्सी येथील थोरापल्ली या छोट्याशा गावात चक्रवर्ती राजगोपालाचारी यांचा जन्म दिनांक 10 डिसेंबर 1878 रोजी झाला. त्यांना सर्वजण प्रेमाने 'राजाजी' या नावाने संबोधत असत. त्यांनी कायद्याची पदवी संपादन केली. वकिली व्यवसायात त्यांनी अल्पावधीतच मोठे यश मिळवले. मात्र देशसेवेचे ध्येय त्यांना अधिक महत्त्वाचे वाटू लागले. महात्मा



गांधींच्या सत्य, अहिंसा आणि लोकसहभाग या विचारांनी ते प्रभावित झाले होते. महात्मा गांधी आणि राजाजी यांचे नाते भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण अध्याय मानला जातो. गांधीजींनी पुकारलेल्या असहकार आंदोलनात त्यांनी मोलाची भूमिका बजावली होती. गांधीजींनी दांडी यात्रा काढल्यानंतर दक्षिण भारतात वेदारण्यम मिठाचा सत्याग्रह आयोजित करुन त्यांनी ब्रिटिश सत्तेला थेट आव्हान दिले. या सत्याग्रहामुळे दक्षिण भारतातील स्वातंत्र्यलढ्याला नवी ऊर्जा मिळाली आणि राजाजींचे नेतृत्व राष्ट्रीय स्तरावर अधिक ठळकपणे समोर आले. त्यांना अनेक वेळा कारावास भोगावा लागला.

दिनांक 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाल्या नंतर जून 1948 साली चक्रवर्ती राजगोपालाचारी यांची गव्हर्नर जनरलपदी नियुक्ती करण्यात आली. या पदावर विराजमान होणारे ते पहिले एकमेव भारतीय ठरले. राजकारणाबरोबरच ते एक उत्कृष्ट लेखक, अभ्यासक होते. त्यांची ओळख केवळ राजकीय नेते म्हणून नव्हे, तर एक सांस्कृतिक दूत आणि विचारवंत म्हणूनही केली जाते. त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाचा, प्रशासकीय कार्यक्षमतेचा, वैचारिक नेतृत्वाचा आणि लोकशाही मूल्यांप्रती असलेल्या निष्ठेचा विचार करुन, त्यांनी देशाप्रती दिलेले योगदान पाहून त्यांना भारतरत्न ह्या पुरस्काराने गौरविण्यात आले.

Chakravarti Rajagopalachari - An Ideal of Principled Leadership

In 1954, when India announced the Bharat Ratna the nation's highest civilian honour Chakravarti Rajagopalachari was among the first three distinguished recipients. A senior freedom fighter, social reformer, author, thinker, skilled administrator, and the first and only Indian Governor-General of independent India, Rajagopalachari dedicated his life to public service and nation-building.

Born on 10 December 1878 in the small village of Thorapalli in the then Madras Presidency, he was affectionately known as 'Rajaji.' From an early age, After completing his law education, he established himself as a successful lawyer within a short time.

Rajaji actively participated in India's freedom movement. He was deeply influenced by Mahatma Gandhi's principles of truth, non-violence, and public participation. The relationship between Gandhi and Rajaji was regarded as an important chapter in the history of India's independence struggle.

Rajagopalachari played a significant role in the Non-Cooperation Movement launched by Gandhi. This movement infused new energy into the freedom struggle in southern India and established Rajaji as a prominent national leader. His activism also led to multiple imprisonments.

After India attained independence on 15 August 1947, Rajagopalachari was appointed Governor-General in June 1948, becoming the first and only Indian to hold that office.

Beyond politics, he was also an accomplished writer and scholar. He was recognised not only as a political leader but also as a cultural ambassador and intellectual figure. In recognition of his contributions to the freedom movement, administrative excellence, principled leadership, and unwavering commitment to democratic values, he was honoured with the Bharat Ratna.